Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed


Multidisciplinary International Research Journal

December - 2023

(CDXLVIII) 448 (B)

COMPREHENSIVE HUMAN RIGHTS

(ISSUES & SOLUTIONS : NATIONAL PERSPECTIVES)



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

Executive Editor
Dr. Sandip B. Kale
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

Editor
Dr. Archana S. Dahane
Director
Department of Physical Education
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor – (SJIF) –8.632 ISSN – 2278-9308

B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

December-2023

(CDXLVIII) 448-B

COMPREHENSIVE HUMAN RIGHTS

(ISSUES & SOLUTIONS: NATIONAL PRESPECTIVES)

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr. Sandip B. Kale
Executive Editor
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo Dist. Wardha

Dr. Archana S. Dahane
Editor
Director of Physical Education
YeshwantMahavidyalaya, Seloo, Dist. Wardha

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

INDEX-B

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	स्त्रियांचे विश्व आणि मानवी हक्क — प्रा.डॉ. संजय गोरे	1
2	भारतीय राज्यघटना आणि मानवी अधिकार — डॉ.कऱ्हाळे व्हि.एल.	4
3	मराठी साहित्य आणि मानवी हक्क — डॉ. हिरा त्र्यंबक वाघ (चव्हाण)	6
4	दलित साहित्य आणि मानवी हक्क — प्रा. डॉ. संगीता दिपक सुर्यवंशी	16
5	स्त्री पुरुष समानता आणि मानवाधिकार — सुर्यकांत फकिरा जाधव	18
6	दलित हे विशेषण असंवैधानिक असून, ते मुलभूत हक्क व मानवी हक्क विरोधी आहे. — ॲड. राजेश तायडे	21
7	मराठी स्त्रीवादी साहित्य व मानवी हक्क — प्रा. डॉ. सौ. वैशाली गभने, (सुरकार)	25
8	मानवी हक्क आणि आदिवासी समाज — डॉ. जयश्री पं. काळे	28
9	भारतीय संविधान आणि मुलभूत अधिकार — प्रा.संतोष एम.रामटेके, प्रा.डॉ.माया वाटाणे	32
10	महिलांचे मानवाधिकार : एक ऐतिहासिक अध्ययन — डॉ. कैलाश फुलमाळी	37
11	दलित साहित्य आणि मानवी हक्क — देवीदास गेंदुजी मेटांगे	41
12	भारतीय संविधानात मानवी हक्कांचे संरक्षण — डॉ. विकास चांदजकर	47
13	मानवी हक्क : इतिहास आणि तत्त्वज्ञान — प्रा.डॉ.चांगुणा विठ्ठल कदम	50
14	आदिवासी साहित्य आणि मानवी हक्क — श्री. संतोष अ. सूर्यवंशी	54
15	मानवी हक्क आणि अण्णाभाऊ साठेंची दलित जाणीवांची साहित्यिक भूमिका — प्रा. महेश भाऊ थोरात	59
16	मानवी हक्क व मूलभूत अधिकार — प्रा.डॉ. मंजूषा ह. धापुडकर	64
17	मानवाधिकार आणि अन्नसुरक्षा — प्रा. डॉ. जी. आर सोमकूंवर	68
18	मानवी हक्क – संयुक्त राष्ट्र व भारतीय संविधान : एक तुलनात्मक विश्लेषण — डॉ.तरोडे विजय लक्ष्मण	73
19	ऋग्वेद काळ व मानवी अधिकार — डॉ. अनंत रिंढे	76
20	शालेय व कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रमातील आवश्यक सेवांचा अभ्यास — श्री. प्रवीण नत्थुजी गेडाम , डॉ. हृषीकेश दलाई	79

21	ट्रान्सजेंडर व्यक्तीसाठी मानवी हक्क सुनिश्चीत करणे: एक व्यापक विश्लेषण — कु. प्रेमलता कवडुजी बुरंगे	84
22	मानवी हक्क आणि शांतता — डॉ. अजय पेत्रस बोरकर	89
23	पाश्चात्य विचारसरणीतील अभिजात परंपरांचा उगम : मानवी हक्कांबद्दल — प्रा. डॉ. सुनिलदत्त सो. गवरे	93
24	ग्रंथालय विज्ञानाच्या अभ्यासात मानवी हक्क : एक अभ्यास — डॉ सारिका गोपाळराव चौधरी	98
25	मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा व भारत — प्रा. काळुराम दामु शिंदे	102
26	मानवी अधिकार आणि दहशतवाद — डॉ. विनोद मारोतराव मुडे	107
27	अन्नाचा अधिकार आणि मानवी हक्क — **Prof. Suchita Turkhade (Patil)**	112
28	खान्देशातील 'ठेलारी' या भटक्या मेंढपाळधनगरांच्यामानवी हक्कांचे उल्लघन — प्रा. आनंद वनदेव पवार, प्रा.डॉ. मनिषा अनिल कचवे	116
29	शाश्वत विकास आणि मानवी हक्क (अधिकार) यांतील सहसंबंध — प्रा. डॉ. वर्षा गंगणे	122
30	दलित समुदाय आणि मानवी हक्क — प्रा.कीर्ती ललेंद्र शेन्डे	125
31	मानवी हक्क आणि शासन — डॉ. अशोक दशरथ सातपुते	130
32	शालेय स्तरावरील मूल्यशिक्षणाच्या उद्दिष्टांचा मानवाधिकार घोषणापत्रातील कलमांशी असलेला सहसंबंध — एक अभ्यास — डॉ. उर्मिला संजय व्यवहारे, प्रवीण गेडाम	135
33	सार्वजनिक ग्रंथालये आणि मानवी मुल्य व हक्क — प्रा.डॉ.धनंजय गभने	143
34	वर्धा जिल्ह्यातील लोकसंख्या वाढ आणि वृद्धीदराचा चिकित्सक अभ्यास (1961 - 2011) — प्रा. बुद्धघोष मधुकरराव लोहकरे	147
35	मानवी हक्क आणि भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका — प्रा.डॉ.प्रवीण जयकृष्ण गुल्हाने	152
36	मानवाधिकार आणि युद्ध पीडित — नारायण थोरात	156

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDXLVIII) 448-B
ISSN : 2278-9308 December, 2023

मानवी हक्क : इतिहास आणि तत्त्वज्ञान

प्रा.डॉ.चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ता.आंबेगाव,जि.पुणे. ,मोबाईल नं - ९५२७७२७६८६
ईमेल - kadamcv.78@gmail.com

विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचे घटित म्हणून मानवी हक्क संकल्पनेचा उदय झालेला दिसून येतो. दुसऱ्या महायुद्धापर्यंत राज्यप्रणित हक्कांची संकल्पना रुढ होती. हक्कांच्या राज्यप्रणित संकल्पनेत 'राज्यसंस्थेद्वारा मान्य केले जाणारे व राज्यसंस्थेच्या कार्यक्षेत्रातच उपलब्ध असणारे व्यक्तीचे दावे' म्हणजे हक्क, अशी धारणा होती. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आलेल्या मानवी हक्क संकल्पनेने राष्ट्र राज्याच्या सीमा ओलांडून हक्क विषयक चर्चा विश्वाला वेगळे परिमाण प्राप्त करून दिले. आता राज्याची मान्यता असो किंवा नसो व्यक्तीला जन्मतःच काही हक्क प्राप्त होत असतात. ही संकल्पना अधिमान्य झाली आहे. थोडक्यात व्यक्ती ही मानव प्राणी असल्यामुळे तिला स्वभावतःच काही हक्क प्राप्त होतात आणि ती एखाद्या देशाचा नागरिक असो किंवा नसो तिला आपल्या मानवी हक्कांच्या रक्षणाचा दावा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर करता येतो.

शोधनिबंधाची उद्दिष्टे -

१. मानवी हक्कांचा इतिहास जाणून घेणे.
२. मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान विशद करणे.

शोधनिबंधाची गृहितके -

१. मानवी हक्कांना ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.
२. मानवी हक्कांचा इतिहास वैदिक कालखंडापासून पहावयास मिळतो.
३. मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान सर्वसमावेशक स्वरूपाचे असलेले दिसून येते.

संशोधन पध्दती –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

मानवी हक्कांचा इतिहास -

अनेक मानवी संस्कृतींना विविध स्वरूपामध्ये हक्कांच्या संकल्पनेचे आकलन झाले आणि त्या संकल्पनांचा अर्थ लावण्यात आला. हक्कांविषयीच्या संकल्पनांचा बायबल, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये विकास झाला. इतिहासकालीन डरचा राजा डर नम्मु याने ख्रिस्त पूर्व २०२५ च्या कालखंडामध्ये कायदेविषयक संहिता निर्माण केली. ही संहिता निर्विवादपणे पहिली कायदेविषयक संहिता आहे. अशा प्रकारे जतन केलेल्या दस्तऐवजांचे हमुराब्बी संहिता हे एक उत्तम उदाहरण आहे. मानवी हक्क व त्यांचे जतन, संरक्षण या कल्पना प्रत्यक्षात जरी विसाव्या शतकात विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर साकार झाल्या असल्या तरी मानवी हक्कांच्या संकल्पनांचा उल्लेख अगदी प्राचीन काळापासून आढळतो. मानवी हक्कांचा इतिहास प्राचीन, मध्ययुगीन,आधुनिक कालखंडातून अभ्यासता येतो.

प्राचीन कालखंड -

प्राचीन कालखंडाचा विचार करता मानवी हक्कांच्या अभ्यासकांच्या मते मानवी हक्कांची संकल्पना प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्याइतकीच जुनी आहे. पण ग्रीक व रोमन परंपरेपूर्वी म्हणजे ख्रिस्त पूर्व काळापासून मानवी हक्कांचा अंतर्भाव केलेला दिसतो. प्राचीन कालखंडातील मानवी हक्कांच्या इतिहासात पुढील विभागानुसार स्पष्टीकरण पाहणे आवश्यक ठरते.

ख्रिस्तपूर्व परंपरा -

पर्शियन साम्राज्याने सम्राट सायरसच्या राजवटीमध्ये ख्रिस्त पूर्व सहाव्या शतकात मानवी हक्कांची अभूतपूर्व तत्वे प्रस्थापित केली. ख्रिस्त पूर्व ५३९ मध्ये पर्शियाच्या राजाने बॅबिलोनवर विजय मिळविला. आपल्या विजयानंतर त्याने सायरस वृत्तचित्ती काढली. आजही ही वृत्तचित्ती मानवी हक्कांचा दस्ताऐवज म्हणून ओळखली जाते. या वृत्तचित्तीने गुलामगिरी नष्ट केली आणि त्यावेळी पर्शियन राज्यकर्त्यांचे सर्व राजवाडे पगारी मजुरांकडून बांधण्यात आले. सायरसने

यहुदी धर्माच्या अनुयायांना गुलामगिरीतून मुक्त केले व त्यांना पुन्हा त्यांच्या भूमीवर स्थलांतर करण्यास परवानगी दिली.

सम्राट अशोकाची राजवट -

तीन शतकानंतर प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याने ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील सम्राट अशोकाच्या राजवटीमध्ये नागरी हक्कांची अभूतपूर्व तत्वे प्रस्थापित केली. सम्राट अशोकाने कलिंग विजयानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करून अहिंसेचे धोरण स्वीकारले. सर्व पंथ आणि धर्माची सहिष्णुता राखणे, पालकांच्या आज्ञेचे पालन करणे, गुरुजनांचा आदर करणे, सर्वांशी माणुसकीने व प्रेमाने वागणे असे मुख्य तत्वे लागू केली. या सुधारणा सम्राट अशोकाच्या आज्ञापत्रांमध्ये वर्णन करण्यात आल्या आहेत. पुढे अशोकस्तंभावरे त्या कोरण्यात आल्या. ख्रिस्तपूर्व काळात हक्क व कर्तव्य बहुधा धार्मिक तत्त्वावर पार पाडली जात असत. देवाने मानवाची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे सर्व मानव समान आहेत अशी हक्कांविषयीची मर्यादित जाणीव या काळात करून दिल्याचे दिसते.

ग्रीक परंपरा –

स्ट्राइकस या ग्रीक रोमन तत्ववेत्याने मांडलेल्या नैसर्गिक कायद्याच्या सिद्धांतामध्ये मानवी हक्कांच्या आधुनिक विचारांचे बीजारोपण झालेले पहावयास मिळते. सा□क्रेटिस आणि प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यात प्रतिबिंबित होतात अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात. याचा अर्थ प्रामुख्याने निसर्गावर नियंत्रण ठेवणारी दैवी इच्छा असा होतो. याचे अभिजात उदाहरण ग्रीक साहित्यामध्ये आढळते. प्लेटोच्या वैश्विक सत्य आणि सद्गुण यांच्या कल्पनेतून हक्कांची वैश्विक संकल्पना साकार झाली. प्लेटोच्या मते, "सद्गुण हे हक्क व कर्तव्यांशी जोडले गेले आहेत. प्रत्येकाकडे सद्गुण असतातच व त्यानुसार प्रत्येकाचे हक्क व कर्तव्य असतात."१

रोमन परंपरा -

प्राचीन रोममध्ये नैसर्गिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहिली. रोमन कायदेपंडित उल्लीमानचा असा विश्वास होता की, "कुठलीही व्यक्ती मग ती रोमन असो किंवा नसो अशा प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक हक्क असतात."२

मध्ययुगीन कालखंड –

मध्ययुगामध्ये स्वाभाविक कायद्याच्या सिद्धांताची दैवी तत्त्वावर पुनर्रचना करण्यात आली. या कालावधीमध्ये ख्रिस्ती ईश्वरासंबंधी परंपरांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. मध्ययुगातील तत्त्वज्ञ अ□बेला□र्ड, सेंटथॉमस अ□क्विनास यांनी नैसर्गिक कायद्यांची संकल्पनाही सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले.

पाश्चात्त्य विचारसरणी -

सामाजिक संविदात्मक विचारवंतांनी नैसर्गिक, व्यक्तिगत,हक्कांच्या कल्पनेला हातभार लावला आणि बऱ्याचशा अन्य पाश्चात विचारवंतांनी वेगवेगळ्या सिद्धांतांद्वारे मानवी हक्काच्या उत्क्रांतीस हातभार लावला. त्यातील प्रमुख विचारवंत पुढीलप्रमाणे -

ह्युगो ग्रा□शियस -

ग्रा□शियस यांनी स्वाभाविक कायद्याचा त्याचप्रमाणे आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचा पाया घालण्यासाठी उत्कृष्ट रचना केली. १७ व्या शतकाच्या प्रारंभी ग्रा□शियसने प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांच्या आधुनिक कल्पनेची ओळख करून दिली. त्यांच्या मते, "मानवास मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क प्राप्त झालेले आहेत. म्हणून प्रत्येकाने मान्य केले पाहिजे की प्रत्येक व्यक्ती स्वतःचे जीवन वाचविण्याचा, प्रयत्न करण्यास हकदार आहे."3

हा□ब्जच्या मते मानवी हक्क म्हणजे, "प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची विशेष सुरक्षितता होय. त्यांच्या मते हा हक्क अन्य कोणत्याही हक्कांपेक्षा मूलभूत स्वरूपाचा आहे."४

जॉन लॉकच्या मते, "मनुष्यप्राणी हा मुळात मुक्त, समान व स्वतंत्र आहे. म्हणून शांतता व सदिच्छा आणि परस्पर सहकार्य या स्वाभाविक स्थितीच्या अटी आहेत. जॉन लॉक ने प्रत्येक व्यक्तीस केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला अदेय असे नैसर्गिक हक्क दिले. त्यामध्ये खाजगी मालमत्तेच्या हक्कास प्राधान्य देण्यात आलेले आहे."५

रुसो यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनांना महत्त्व दिले. रुसोने सामान्यपणे समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीत काही मूलभूत हक्क असतात त्या हक्कांना संरक्षण मिळाले पाहिजे. कारण मानवी हक्कांची संकल्पना म्हणजे नैतिक पाया आहे.

इम□न्यूअल कांटने या संकल्पनेला विश्वव्यापी किंवा सार्वत्रिक बनविले.जेरेमी ब□न्थमने व्यक्तिगत हक्क किंवा आनंदाबरोबर सामुदायिक हक्क किंवा आनंदही महत्त्वाचे असतात यावर भर दिला. जॉन स्टुअर्ट मिलच्या मते अभिव्यक्ती व समूह स्वातंत्र्य निरपवाद असू शकत नाही. आपापले स्वातंत्र्य प्राप्त करण्याकडे इतर व्यक्तींची क्षमता हिरावून न घेता असे स्वातंत्र्य अस्तित्वात असले पाहिजे. मॉन्टेस्क्यूने काही अंशी मानवी हक्कांच्या लौकिक रूपांवर जोर दिला.

आधुनिक कालखंड -

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मध्यम पातळीवर मानवी हक्कांचे सर्वभौमिकरण करण्याचे प्रयत्न व्हर्सायच्या करारानुसार झाले होते पण ते यशस्वी होऊ शकले नाही. व्यक्तीचे तिच्या स्वतःच्याच राज्याकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संरक्षण केले पाहिजे यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा संस्थेच्या सभासदांनी मानवी हक्कांचे जतन करण्यासाठी काही उपाय सुचविण्यास आरंभ केला. या संस्थेचे सभासद युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील विविध राष्ट्रांत विखुरले होते. त्यांनी मानवी हक्कांचे जतन करण्याबाबत प्रत्येक राष्ट्राच्या सहा कलमी कार्यक्रमाचा स्वीकार केला.

मानवी हक्कांचे सार्वभौमिकरण करण्याच्या प्रक्रियेचा दुसरा मैलाचा दगड ठरला तो म्हणजे जर्मनीतील नाझी यांनी धर्म किंवा वंश यांच्या नावावर केलेलेल्या सहा दशलक्ष ज्यू लोकांची निर्घृण हत्या. दुसऱ्या महायुद्धातील या घटनेचे पडसाद संपूर्ण जगात उमटले. या घटनेने व्यथित झालेले अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी मानवी हक्कांची आवश्यकता प्रतिपादन करताना चार प्रकारच्या मानवी हक्कांची पायाभरणी करून त्या आधारे मानवी जगाचे स्वप्न पाहिले. भारतातील 1993 सालच्या मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार, "मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही. तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे."६

अटलांटिक सनद -

ग्रेट ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान विल्स्टन चर्चिल आणि अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकलिन डी रुझवेल्ट यांनी अटलांटिक महासागरावर एक संयुक्त पत्रक ऑगस्ट १९४८ साली जाहीर केले हे संयुक्त पत्रक अटलांटिक सनद म्हणून ओळखले जाते. हे पत्रक जरी दोन नेत्यांचे मत असले तरी त्याद्वारे त्यांनी मानवी हक्क संबंधित काही सर्वमान्य तत्वे प्रतिपादन करून सुंदर व भव्य जगाचे आशादायी स्वप्न पाहिले होते. त्यांनी त्यांच्या पत्रकात स्वातंत्र्य, स्वराज्य व आर्थिक स्वातंत्र्य या मूल्यांवर भर दिला. पुढे अमेरिकेतील स□नफ्रान्सिस्को शहरात २५ एप्रिल ते २६ जून १९४५ या कालावधीत आयोजित संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत मानवी हक्कांच्या संदर्भात केलेल्या सनदेत मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य याबाबत अनेक तरतुदी करताना वंश, लिंग, भाषा व धर्म या आधारे सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार प्रदान करण्यात आले. सामाजिक व आर्थिक मंडळाने ऐक्याचे काम करताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण संसदेच्या १० डिसेंबर १९४८ रोजी झालेल्या आमसभेतून मानवी हक्कांचा जाहीरनामा करून तो स्वीकारण्यात आला. यात मानवी हक्कांच्या विविध पैलूंवर व प्रकारांवर चर्चा करण्यात आली. आज जगातील सर्व राष्ट्रांनी मानवी हक्कांची संकल्पना स्वीकारली आहे. आज जागतिक स्तरावर मानवी हक्क व मानवतावादी करारांची संख्या सुमारे ९० इतकी आहे. म्हणून विसावे शतक मानवी हक्कांचे शतक मानण्यास हरकत नाही.

मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान -

मनुष्यास जन्मतः असलेले अधिकार स्पष्ट करणारे हे कायदे आहेत. यामध्ये अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जमाती वयोवृध्द व्यक्ती, कामगार इत्यादी समाजातील घटकांच्या कल्याणासाठी ह्या मानवाधिकारांची निर्मिती केलेली आहे. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात एकूण ३० कलमांचा समावेश होतो. ही ३० कलमे म्हणजे मानवी हक्कांचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान म्हणावयास हरकत नाही. पहिल्या भागातील सुरुवातीची दोन कलमे ही सर्व मानवी हक्कांच्या पायाभूत तत्वांना अधोरेखित करतात. सर्व मानव जन्मतः स्वतंत्र आहेत. प्रतिष्ठा व हक्कांबाबत समान आहेत. कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येकाला सर्व मानवी हक्क आणि स्वातंत्र्य उपलब्ध असतील. प्रत्येक व्यक्तीला जीवित स्वातंत्र्य आणि सुरक्षेचा हक्क असेल. गुलामगिरी आणि गुलामांच्या व्यापारापासून स्वातंत्र्य असेल. मानवी हक्कांमुळे व्यक्तीची छळ आणि अमानवी शिक्षेपासून मुक्तता असेल. व्यक्ती कायद्यासमोर सर्व समान असतील. व्यक्तीला मनमानी अटक किंवा तडीपारीपासून स्वातंत्र्य असेल. प्रत्येक व्यक्तीला रास्त सुनावणी आणि खुला सुनावणीचा हक्क असेल. अपराध सिद्ध होईपर्यंत त्या व्यक्तीला निरपराध बनविण्याचा हक्क. एकांतवास आणि प्रतिष्ठेचा हक्क व संचार स्वातंत्र्य, राजकीय

आश्रयाचा हक्क, राष्ट्रीयत्वाचा हक्क आणि कुटुंब संरक्षणाचा हक्क, मालमत्ता हक्क,विचार, विवेक आणि धार्मिक स्वातंत्र्य, मत अभिव्यक्ती आणि माहितीचे स्वातंत्र्य, शांततेने एकत्र येण्याचा आणि संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, शासनामध्ये सहभागी होण्याचा आणि सार्वजनिक सेवेमध्ये समान प्रवेशाचा हक्क, सामाजिक सुरक्षितता, कामाचा आणि समान कामासाठी समान वेतनाचा हक्क, विश्रांती, निवांतपणा, दर्जायुक्त जीवनमानाचा, शिक्षणाचा हक्क, समूहाच्या सांस्कृतिक जीवनामध्ये सहभागी होण्याचा हक्क. इ.

कालांतराने मानवी हक्काच्या वैश्विक घोषणापदाचे दोन स्वतंत्र करारामध्ये विभाजन करण्यात आले. त्यापैकी एक नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करार आणि दुसरा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करार होय.वैश्विक घोषणापत्रामध्ये समाविष्ट असलेल्या मानवी हक्क आणि स्वातंत्र्याचा विस्तार करून त्यांचा अंतर्भाव दोन करारांमध्ये करण्यात आला. १९६६ साली संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने या दोन्ही करारांचा स्वीकार केला. आणि १९७६ सालापासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

निष्कर्ष

१. मानवी हक्कांची संकल्पना पुरातन आहे.

२. मानवी हक्कांना नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.

३. मानवी हक्क ही संकल्पना फार व्यापक आणि बहुआयामी स्वरूपाची आहे.

४. आधुनिक मानवी हक्कांची कल्पना असे मानते की, हक्क हे अखिल मानव जातीसाठी आहेत.

५. मानवी हक्कांच्या प्रतिपादनानुसार मानवाचे ते जन्मसिद्ध हक्क आहेत. व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, जिवंत राहण्याचा हक्क आणि आपले हक्क उपभोगण्याचा हक्क आहे. या नैतिक अधिकारांवरच अन्य अधिकारांचा उपयोग अवलंबून असतो.

संदर्भ टिपा -

१) व्ही.बी.पाटील, मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन्स, चौथी आवृत्ती, २०१२, पुणे, पृ. १५.

२) उषा बाहुबली पाटील, (संपा.), समाज आणि मानवी हक्क, शिवाजी विद्यापीठ, मुद्रणालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०१५, पृ.०३.

३) अशोक शामराव चव्हाण व इतर, (संपा.), मानवी हक्क, शिवाजी विद्यापीठ, मुद्रणालय, प्रथमावृत्ती, २०१५, पृ.०५.

४) पूर्वोक्त, व्ही. बी. पाटील, पृ.१००.

५) तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, मानवी हक्क, द युनिक अ□कॅडमी, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २०१५, पृ. १२५.

६) श्री.नी.सबनीस, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, मुकुन्द प्रकाशन, सुधारित आवृत्ती ,२००८. पृ.१००.

७) महिलाः कायदे व अधिकार, महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग मंत्रालय, मुंबई, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे, प्रथमावृत्ती, २००८.

८) Asima Sahu, Womens liberation and Human rights, pointer publishers, Jaipur,2007

९) L.N. Basu, Human Rights, Practice and limitations,pointer publishers, Jaipur, First Edition, 2006.

१०) Jagannath Mohanty, Teaching of Human Rights New Trends and Innovations, Deep and Deep publications,pvt.Ltd.New Dehi,2005.